# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालय विकास विभाग

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी—पॉईट मार्ग नागपुर—४४० ०३३.

फॅक्स नं. ०७१२—२५५५७०१, Email ID : infoarcollege@ymail.com


जा.क्र. रातुमनावि/म.वि.वि./जअतु २०२३—२४/१३३० दि. १९ जुलै, २०२३

# :: अधिसुचना ::

## शैक्षणिक सत्र २०२३—२०२४ करीता जलदगती अतिरीक्त तुकडयांकरिता अर्ज मागविण्याबाबत

१२ वी च्या परीक्षेत मोठया संख्येने विद्यार्थी उत्तीर्ण झाल्यामुळे व कोणताही विद्यार्थी ईच्छित उच्च शिक्षणापासुन वंचित राहु नये याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (८) मध्ये असलेल्या तरतुदीनुसार जलदगती पध्दतीने अतिरीक्त तुकडयांना मान्यता देण्याबाबतचा निर्णय शासन निर्णय दिनांक ०४ जुलै, २०१७ अन्वये घेतला आहे. **त्यानुषंगाने सुचविण्यात येते की, ज्या संलग्नित महाविद्यालयांचे नॅक (NAAC)/एनबीए (NBA) मानांकन व मुल्यांकन तसेच पुनर्मुल्यांकन झाले आहेत व अस्तित्वात असलेल्या अभ्यासक्रमातील मुळ तुकडीच्या सर्व विषयाकरिता विद्यापीठ मान्यताप्राप्त पुर्णवेळ शिक्षक उपलब्ध आहेत व मंजुर प्रवेश क्षमतेनुसार विद्यार्थी प्रवेशित झालेले आहेत. परंतु महाविद्यालयात विद्यार्थी प्रतिक्षा यादीत आहेत, अशा सर्व संलग्नित महाविद्यालयांकडुन फक्त सत्र २०२३—२०२४ करीता जलदगती अतिरीक्त तुकडयांकरिता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.**

ज्या महाविद्यालयांना सत्र २०२३—२०२४ करिता अतिरीक्त तुकडीची आवश्यकता आहे. अशा महाविद्यालयांनी वित्त व लेखा विभागाकडे रु. १६००/— त्यावर १८ टक्के वस्तु व सेवा कर रु. २८८ असे एकुण १,८८८ भरुन त्याची पावती महाविद्यालयीन विकास विभाग येथे सादर करुन अर्जाची लिंक सुरु करण्याकरिता User ID o Password प्राप्त करुन घ्यावे. त्यानंतर विद्यापीठ अधिसूचना क्रमांक : लेखा/व्यय/सा/७०, दिनांक २७ एप्रिल, २०१२ नुसार (प्रत्येक तुकडीकरीता) रु. १०,०००/— अर्ज शुल्क त्यावर १८ टक्के वस्तु व सेवा कर रु. १८०० असे एकुण रु. ११,८०० लेखा विभागात भरुन **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.ac.in या संकेतस्थळावर Online College Section किंवा https://onlinedcudrtmnu.org या वेब पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहीत नमुन्यात व आवश्यक असलेली कागदपत्रे अपलोड करुन दिनांक २५ जुलै, २०२३ च्या सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच अर्जाची हार्ड कॉपी व सहपत्रे शुल्क भरलेल्या पावतीसह तिन प्रतीत दिनांक २६ जुलै, २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत महाविद्यालयीन विकास विभाग येथे सादर करावी.**

**टिप :— ज्या अभ्यासक्रमांचे प्रवेश केंद्रिय प्रवेश पध्दतीने करण्यात येतात तसेच ज्या अभ्यासक्रमांना शिखर संस्थेची (Appex Body) मान्यता असणे आवश्यक आहे. अशा अभ्यासक्रमांकरिता जलदगती अतिरीक्त तुकडीकरिता अर्ज करु नये.**

अर्ज करणाऱ्या महाविद्यालयांना अर्ज करतांना काही अडचणी आल्यास त्यांनी खालील नमुद कार्यालयात व दुरध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

१) महाविद्यालय विकास विभाग, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी—पॉईट मार्ग नागपुर—४४० ०३३, **दुरध्वनी क्रमांक: ०७१२—२५२९९३२**

२) Help Line No. ९४२२४४४२४३, ०८२७५०४४८३४.

मा. कुलगुरुंचे आदेशानुसार,

उपकुलसचिव

महाविद्यालय विकास विभाग